# कंत्राटी कर्मचारी नियुक्ती जाहिरात

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## सांगली मिरज अॅन्ड कुपवाड सिटी कार्पोरेशन इन्टीग्रेटेड हेल्थ अॅन्ड फॅमिली वेलफेअर सोसायटी

## कंत्राटी पद्धतीने नियुक्ती

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (NUHM) अभियानांतर्गत **कंत्राटी पद्धतीने** ११ महिने मुदतीकरिता **Walk in Interview** द्वारे खालील पद करार तत्त्वावर भरण्यासाठी अर्हताधारक पात्र उमेदवारांना थेट मुलाखतीसाठी बोलविण्यात येणार आहे. तरी पात्र उमेदवारांनी आपले नाव, पदाचे नाव, वय, संपूर्ण पत्ता, दूरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी, शैक्षणिक पात्रता (धारण केलेली पदवी, बोर्ड / विद्यापीठ, उत्तीर्ण वर्ष व टक्केवारी), अनुभव (संस्थेचे नाव, पद, कालावधी, वेतन) फोटो (सध्याचा) (पासपोर्ट साईज) वयाचा पुरावा व मोबाईल नंबर इ. माहिती व अनुषंगिक प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह A4 साईजमध्ये अर्ज मा. आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महापालिका यांचे नावे अर्ज घेऊन दि. ११/०१/२०२१ रोजी स. ११.०० वा. आरसीएच कार्यालय, आपटा पोलीस चौकीजवळ, पाण्याच्या टाकीखाली, उ. शिवाजीनगर, सांगली येथे कार्यालयीन वेळेत हजर राहावे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | एकुण पद संख्या | अनुभव | प्रतिमहा मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १ | अर्धवेळ वैद्यकीय अधिकारी | Specialist (Gynecologist, Surgeon, Physician, Pediatrician) (At least MBBS) if no specialist is available MBBS Graduate may be considaered | ५ | अनुभवी उमेदवारांना प्राधान्य | ३००००/- |

१) पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो. २) वरील पदाकरिता जाहिरात दिनांकास वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी तसेच निवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे राहील, परंतु त्यांचे परिश्रमिक मानधन शासन निर्देशानुसार राहील. ३) मानधन हे ठोक (एकत्रित) स्वरुपात देणेत येणार आहे. ४) सदर पद हे निव्वळ कंत्राटी पद्धतीने केवळ प्रकल्प कालावधीकरिता भरावयाचे असून प्रकल्प बंद होताच सदरील पद आपोआप संपुष्टात येईल. ५) शासकीय अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य राहील. ६) उच्चशिक्षित व अनुभवी उमेदवारांना प्राधान्य देणेत येईल. ७) मुलाखतीस येताना मूळ कागदपत्रे घेऊन स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे. ८) निवड झालेल्या उमेदवारांना ११ महिन्यांची नेमणूक देणेत येणार असून त्यांच्या समाधानकारक कामावर पुनर्नियुक्ती (प्रकल्प कालावधीकरिता) देणेत येणार आहे. ९) ही पदे निव्वळ कंत्राटी असलेने त्याचा मा. शासन / मनपा सेवेशी कोणताही संबंध असणार नाही. १०) नियुक्तीबाबतचा अंतिम अधिकार मा. अध्यक्ष तथा आयुक्त सांमिकु मनपा यांनी राखून ठेवला आहे.

ठिकाण : सांगली, दिनांक : ०७/०१/२०२१
जा. क्र. मनपा/आरोवि/राआअ/८२१/२०२१

सही/- (डॉ. सुनील आंबोळे)
**वैद्यकीय आरोग्य अधिकारी**, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका